पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड प्रभाग कार्यालय, रहाटणी
क्र. डप्र/१७/कावि/७७२/२०१३
दिनांक :- १७ / १२ / २०१३

**विषय :- घंटागाडी ठेकेदारांचे ई.सी.एस फॉर्म बाबत..**

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभाग कार्यक्षेत्रात घंटागाडी ठेकेदार म्हणून एकुण ७३ ठेकेदार घरोघरचा कचरा गोळा करणे व उचलणेचे कामकाज करीत आहे. त्यांना केलेल्या कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेनुसार दरमहा ठरवून दिलेली रक्कम हजर दिवसाप्रमाणे अदा करणेत येत असते. लेखा विभागाकडील परिपत्रक क्र. लेखा/१८/कावि/१८६/१३ दि. ३१/१०/२०१३ अन्वये ठेकेदार यांचे बिले ईसीएस द्वारे अदायगीकामी आवश्यक ती माहिती **प्रपत्र - अ** मध्ये भरुन लेखा विभागाकडे सादर करणेकामी कळविले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व संबंधित आरोग्य निरिक्षकांना सुचित करणेत येते की, आपआपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या घंटागाडी ठेकेदारांची ईसीएस बाबतची माहिती सोबत दिलेल्या **प्रपत्र - अ मध्ये दोन प्रतीत भरुन त्या फॉर्मवर बँकेचा सही शिक्का घेऊन दि. २३/१२/२०१३ अखेर या कार्यालयाकडे जमा करणे बाबत संबंधित घंटागाडी ठेकेदार यांना सुचना देण्यात यावेत. जो पर्यंत सर्व घंटागाडी ठेकेदारांचे ईसीएस फॉर्म भरुन बँकेच्या सही शिक्यानिशी फॉर्म या कार्यालयाकडे जमा होत नाही. तो पर्यंत पुढील मासिक मानधन अदा केले जाणार नाही. तसेच एकत्रित ईसीएस फॉर्म लेखा विभागाकडे जमा करता येणार नाही.** याबाबत संबंधित आरोग्य निरिक्षकांनी आपआपल्या अधिपत्याखाली घंटागाडी ठेकेदारांना या परिपत्रकाची समज मिळालेबाबत दिनांकित स्वाक्षरी घेऊन स्वाक्षरी पोहोच या कार्यालयाकडे जमा करावी.

सही /-
**सहा.आरोग्याधिकारी**
ड प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
रहाटणी, पुणे १७

प्रति,
संबंधित सर्व आरोग्य निरिक्षक, ड प्रभाग

प्रत :- मुख्य आरोग्य निरिक्षक, ड प्रभाग
२/- सर्व घंटागाडी ठेकेदारांचे ईसीएस फॉर्म भरुन बँकेच्या सही शिक्यानिशी फॉर्म या कार्यालयाकडे तीन दिवसात सादर करणेकामी संबंधित आरोग्य निरिक्षकांना सुचना देण्यात यावेत.